॥ रविवार ॥ हिंदुस्थान

७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

www.dainikhindusthan.com
epaper.dainikhindusthan.com

षड्रिपुंवर विजय...

गजानना, हे गणाधीपा | किती गावा तुझा महिमा |
थक्कित जेथे उमा-रमा | पामर मी ||१||
लोभ धनाचा सोडावा | मद सत्तेचा सोडावा |
का करणे हेवादावा |
हीच घडावी सुधारणा ||२||
गणाधीपा, तुझ्या कृपेने, खंडायाचे क्रोधाला |
वासनांवरती घालून घाला,
जिंकायाचे मोहाला ||३||

■ वर्ष ७७ वे/अंक ३५ वा ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ अमरावती,रविवार दिनांक २० सप्टेंबर २०२६ ■ ■ भारतीय सौर २९ भाद्रपद १९४८ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.००

couch puffy ®
Architectural Choice Furniture!
MEGA SALE
Bedroom Sets Starting ₹ 49,900
100 + Bedrooms on Display
Imported
MRP -1,69,900/-
₹ 1,29,000/-
THE BIG MONSOON SALE
FLAT 50% OFF
BUY 1 GET 1 FREE On Home Decor
For Limited Time
*T&C Apply
100 HOMES 100 BEDROOMS
Only for first 100 families
B5, ड्रिम्झलँड, रहाटगांव रोड, अमरावती | 99300-94691 / 8585-9552-85
BAJAJ FINSERV
काउच पफ़ी

अनेक जिल्ह्यात दुष्काळी स्थिती, सरकार शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणार : मुख्यमंत्री

मुंबई दि. १९ : राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. पावसाचा खंड पडल्यामुळे मोठ्या प्रमाणात पिके खराब होत आहेत.

अनेक ठिकाणी उतारा कमी येईल, अशी परिस्थिती तयार झालेली आहे. या सगळ्या गोष्टींचा आढावा घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. मंत्रिमंडळ बैठकीत सर्वच मंत्र्यांनी यावर चर्चा करून आपापल्या जिल्ह्यांत मूल्यमापन करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. साधारणपणे पुढील आठवड्यात आम्ही प्राथमिक आढावा घेऊ. त्यानंतर पंचनामे आम्ही करू आणि तातडीची मदतही आम्ही करू, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

पत्रकारांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कर्जमाफीचे काम सुरू आहे. याबाबत तीन याद्या तयार करण्यात आल्या आहेत. उर्वरित याद्या वेगाने पूर्ण कराव्यात, असे आदेश दिलेले आहेत. पिण्याचे पाणी, चाऱ्याची व्यवस्था असेल, शेतकऱ्यांना जी तातडीची मदत करणे गरजेचे आहे, ती सर्वतोपरि मदत सरकारच्या वतीने केली जाणार आहे. यावेळी अल निनोचे संकट येणार असल्याचे माहिती असल्यामुळे चाऱ्याची लागवड करून ठेवलेली आहे. जिथे चाऱ्याची टंचाई जाणवेल, तिथे पुरवठा केला जाईल. सायंकाळी शेतकऱ्यांना अतिरिक्त वीज मिळावी, याचीही तजवीज केलेली आहे. त्यामुळे सगळ्या भागात जास्त वीजही आपण देत आहोत. काही ठिकाणी सिंगल फेज असल्यामुळे वीज दिली जात नव्हती; पण, आता तिथेही वीज देण्यासंदर्भात सांगण्यात आले आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

वेगवेगळ्या उपाययोजना आधीपासूनच सुरू केलेल्या आहेत

ज्या ठिकाणी विहिरीला पाणी आहे, त्या ठिकाणी पिके वाचवता येतील. वेगवेगळ्या उपाययोजना आधीपासूनच सुरू केलेल्या आहेत. दुष्काळी उपाययोजना करून काही ना काही दिलासा आपल्या शेतकऱ्यांना आपण देऊ, असा विश्वास मुख्मयंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना, विरोधकांच्या काळातही *(पान २ वर)*

शेतपिकाची नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रयत्न करणार : पालकमंत्री

थेट शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी; वीज पुरवठा तातडीने सुरळीत करण्याचे निर्देश

अमरावती दि. १९ : गेल्या महिन्याभरात जिल्ह्यात पावसाचा खंड पडल्यामुळे सोयाबीन, कापूस, तूर या पिकांच्या परिस्थिती सुधारली नाही. परिणामी उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी आज तिवसा तालुक्यातील किशोर पिंपळे, राजू बहादरपुरे यांच्या शेतामध्ये जाऊन प्रत्यक्ष नुकसान झालेल्या पिकाची पाहणी केली. यावेळी आमदार प्रवीण पोटे, प्रताप

अडसड, राजेश वानखेडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, गेल्या महिनाभराहून अधिक कालावधीत पावसाचा खंड पडला आहे. यामुळे प्रामुख्याने सोयाबीन पिकावर परिणाम झाला आहे. पावसाअभावी सोयाबीन दाणे परिपक्व अवस्थेत आलेले नसल्याने उत्पादनावर परिणाम होणार आहे. परिणामी शेतकऱ्याचे उत्पन्न कमी होईल. यासाठी उपाययोजना म्हणून तातडीने नुकसान झालेल्या शेतपिकाची पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. याबाबतचा अहवाल शासनाकडे सादर करून शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत करण्याचा आग्रह राहील. *(पान २ वर)*

दुष्काळ जाहीर करा, हेक्टरी ५० हजार द्या : हर्षवर्धन सपकाळ

मुंबई दि. १९ : महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये पावसाने दडी मारल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाचा खंड आणि पिकांचं नुकसान यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठं संकट उभं राहिल्याचा दावा विरोधकांकडून केला जात आहे. याच मुद्द्यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महायुती सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे.

राज्यातील अनेक भागात दुष्काळाची गंभीर परिस्थिती आहे, दीड महिन्यापासून पावसाचा एक थेंबही नाही, शेतातील पिके करपून गेली आहेत. पण महायुती सरकारचे त्याकडे लक्ष नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकीत फक्त चर्चा पण ठोस निर्णय घेतला नाही, पालकमंत्री शेतकऱ्यांकडे फिरकले नाहीत. शेतकरी संकटात असताना सरकार वेळकाढूपणा करत आहे. राज्यातील दुष्काळाची परिस्थिती पाहता सरकारने तात्काळ दुष्काळ जाहीर करुन हेक्टरी ५० हजार रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावेत, सरसकट कर्जमाफी द्यावी अन्यथा मंत्र्यांना राज्यात फिरू देणार नाही, असा इशारा *(पान २ वर)*

जुन्या नोंदी, कागदपत्रांच्या अडचणींवर तोडगा निघाला मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर सरकारचा मोठा निर्णय

मुंबई दि. १९ : मराठा समाजासाठी मोठी बातमी आहे, मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सरकार कामाला लागलंय. ओबीसी नोंदी मिळवण्यात अडचणी येत असल्यानं अनेकांना कुणबी प्रमाणपत्र मिळत नाहीये. जुन्या नोंदी, कागदपत्रांच्या अडचणींवर दूर करण्यासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतलाय. सरकार आता मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात उच्चाधिकार समिती स्थापन केली जाणार आहे. याबाबतीची माहिती मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलीय.

दरम्यान उपोषण सोडल्यानंतर मनोज जरांगे पाटील हे छत्रपती संभाजीनगरच्या गॅलेक्सी रुग्णालयात उपचार घेत आहेत. उपोषणामुळे अशक्तपणा आल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलंय. शुक्रवारच्या रात्री जरांगे पाटील यांची तब्येत अचानक बिघडली होती, त्यामुळे त्यांना तातडीने

रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आज शनिवारी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्यांची भेट घेतली. जरांगेच्या तब्येतची विचारसपूस करत मराठा आरक्षणासाठी सरकार करत असलेल्या कामांची माहिती दिलीय.

या भेटीत विखे पाटील यांनी राज्य सरकारने मराठा समाजाला कुणबी जातीचीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयाची माहिती माध्यमांना दिली. सरकार आता मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र उच्चाधिकार समिती स्थापन करणार आहे. या समिती जिल्हाधिकारी स्तरावर मराठा आरक्षणासाठी कुणबी जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी येणाऱ्या अडचणी, जुन्या नोंदी आणि आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देतील.

जुनी कागदपत्रे आणि नोंदी शोधण्यात अनेक अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे प्रमाणपत्रांचे वाटप करता येत नव्हते. यावर सरकारने कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतलाय. या समितीला कुणबी जात प्रमाणपत्राबाबत आवश्यक अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठीची कागदपत्रे, त्यासंदर्भातील नोंदी सहज उपलब्ध होतील, असा दावा विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केलाय.

भाविकांची कार नाल्यात वाहून गेली ३ चिमुकल्यांसह ८ जणांचा शेवट

भोपाळ दि. १९ : भाविकांची कार नाल्यात वाहून गेल्यानं ८ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये ३ लहान मुलं, २ महिला आणि ३ पुरुषांचा समावेश आहे. हा अपघात प्रसिद्ध सिद्धपीठ माँ बगलामुखी मंदिराच्या जवळ घडला. घटनेची माहिती मिळताच प्रशासनानं मदत आणि बचाव कार्य सुरू केलं. अपघातानंतर स्थानिकांनी नाल्याजवळ तोबा गर्दी केली होती. या दु:खद घटनेनंतर हळहळ व्यक्त होत आहे. मध्य प्रदेशच्या आगर *(उर्वरित पान २ वर)*

माहोल....

हे विघ्नहर्ता ,कृपया हे राज्यावरचं दुष्काळाचे संकट जाऊ दे रे आणि चांगला पाऊस पडू दे रे विनायका!

मोदींच्या हस्ते युवकांना रोजगार मेळाव्यात नियुक्तीपत्र प्रदान

नवी दिल्ली दि. १९ : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज २० व्या रोजगार मेळाव्यात

व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून विविध सरकारी संस्थामध्ये नियुक्त झालेल्या ५१ हजारांहून अधिक युवकांना नियुक्तीपत्र वितरीत केली. केंद्र सरकार गेल्या काही वर्षांपासून युवकांना भविष्यातील आव्हानांसाठी आवश्यक कौशल्ये आणि संधी उपलब्ध करून देण्यावर सातत्याने *(पान २ वर)*

भव्य-दिव्य उद्घाटन सोहळ्याने 'एशियन गेम्स २०२६'च्या महाकुंभाला सुरुवात

नवी दिल्ली दि. १९ : नागोयाच्या मिजुहो पार्क ॲथलेटिक स्टेडियममध्ये शनिवारी २० व्या आशियाई स्पर्धेचे भव्य उद्घाटन पार पडले. या खास क्षणी संपूर्ण आशियातील खेळाडू एकत्र जमले होते. त्यांच्या उपस्थितीत आशिया खंडातील सर्वात मोठ्या खेळाच्या महाकुंभाला अशाप्रकारे सुरुवात झाली आहे.

उद्घाटन सोहळ्यादरम्यान स्टेडियममध्ये रंगेबीरंगी रोशनाई व शानदार सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संगीत व उत्साहाच्या या वातावरणात पदक तालिका व सामन्यांची चर्चा काही अंशी मागे पडली होती, तर प्रत्येक खेळाडू व उपस्थित क्रीडा रसिकांनी या ऐतिहासिक क्षणाचा पुरेपूर आनंद घेतला. *(उर्वरित पान २ वर)*

अब कॅम्प अमरावती में
मिठाइयाँ | नमकीन | केक | नाश्ता | बेकरी प्रोडक्ट
डागा प्लाझो, डी मार्ट के सामने, कॅम्प, अमरावती
85000-11122 | 80015-56000
रघुवीर मिठाइयाँ

गणपती और महालक्ष्मी के पावन अवसर पर
लग भग आधी किमतें
सबसे सस्ते 3 दिन
दि. 18 19 20 सप्टेंबर
शुक्रवार | शनिवार | रविवार
फ्रेश स्टॉक
डायरेक्ट फॅक्टरी सेल
आराधना®
होलसेल शॉपिंग मॉल
• बनारसी शालू • डिझायनर साड्या • घाघरा ओढनी • सलवार सुट
• ड्रेस मटेरियल • रेडीमेड कोट • सुटिंग-शर्टिंग • टिनेज वेअर • किड्स वेअर
जवाहर रोड, अमरावती. ✆2574594
L -2, बिझीलॅन्ड, नांदगावपेठ, अमरावती.
Ad square

रेडी पजेशन
सुख सुरज इन्फ्रा प्रस्तुत रोड टच, साईनगर 3BHK अल्ट्रा प्रिमियम बंगलो ६८.५० लाख पासुन
दिशा : उत्तर पुर्व/उत्तर बांधकाम १५५० फुट
पत्ता : मुकबधीर विद्यालय रोड, यशवंत लॉन पुढे.
संपर्क-8275590119
9977054960
9130213466

PERSONALISE SOFA WITH YOUR STYLE
01 CHOOSE YOUR SIZE
02 PICK YOUR SIZE
03 SELECT YOUR FABRIC & COLOURS
04 YOUR UNIQUE SOFA IS READY
Customise Your Sofa Today
POONAM FURNITURE
CHAITANYA COLONY, OLD BYPASS ROAD, AMRAVATI

GANESH CHATURTHI SPECIAL OFFER
ALL-IN-ONE PACKAGE
• SHED • LIGHT • POSTER • FILTER + OXYGEN
SPECIAL PRICE
₹1499 TANK SIZE: 2 FT
₹2199 TANK SIZE: 2.5 FT
FISH & FISH AQUARIUM
GANESH COLONY, AMRAVATI
9422917360
OFFER ENDS ON 24/09/2026